महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअँप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २८४ वे | दिनांक : १०/१०/२०२६ | वार : शनिवार

## पुणे शिक्षक मतदारसंघातून चिवटेंची माघार

**पुणे :** राज्यात विधानपरिषद (पदवीधर आणि शिक्षक) निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीमध्ये निर्माण झालेला बंडखोरीचा तिढा अखेर मुख्यमंत्र्यांच्या मध्यस्थीने सुटला आहे. पुणे आणि मराठवाडा मतदारसंघात परस्परांविरोधात उभे राहिलेले महायुतीचे बंडखोर आणि घटक पक्षांचे उमेदवार यांनी अर्ज मागे घेतल्याने आता महायुतीच्या अधिकृत उमेदवारांचा मार्ग मोकळा झाला आहे. पुण्यात शिवसेनेची माघार पुणे शिक्षक मतदारसंघात भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) या दोन्ही पक्षांनी आपले उमेदवार रिंगणात उतरवल्याने मोठी चर्चा रंगली होती. मात्र, आज या निवडणुकीत मोठा ट्विस्ट आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानंतर शिवसेनेचे उमेदवार मंगेश चिवटे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. याबाबत माहिती देताना शिवसेना नेते रवींद्र धंगेकर म्हणाले, "मंगेश चिवटे यांनी गेली कित्येक वर्षे आरोग्य दूत म्हणून आणि शिक्षकांसाठी मोठे काम केले आहे. कार्यकर्त्यांचा त्यांना उमेदवारी मिळण्याबाबत मोठा आग्रह होता. मात्र, पक्षाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार आणि एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार त्यांनी माघार घेतली आहे. एक निष्ठावान शिवसैनिक म्हणून त्यांनी आदेशाचे पालन केले आहे." तसेच, "शिंदे यांनी मंगेश चिवटे यांना न्याय देण्याचा आणि कुठल्या ना कुठल्या रूपात विधानसभेत पोहोचवण्याचा मोठा शब्द दिला आहे," अशी माहितीही त्यांनी दिली. मंगेश चिवटे यांच्या माघारीसोबतच, पुणे पदवीधर मतदारसंघातील महायुतीचे बंडखोर उमेदवार भैय्या माने यांनीही निवडणुकीतून माघार घेतली आहे. त्यामुळे आता पुणे शिक्षक मतदारसंघातून भाजपचे कोस्तुभ गावडे आणि पदवीधर मतदारसंघातून स्मिता जाधव हे महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात असतील. मुख्यमंत्र्यांच्या एका फोनवर मराठवाड्यातही बंडखोरी शमली दुसरीकडे, मराठवाडा पदवीधर मतदारसंघातून महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे सतीश चव्हाण यांना उमेदवारी देण्यात आली आहे. मात्र, तिथे भाजपचे नेते एम. के. देशमुख यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केल्याने महायुतीची डोकेदुखी वाढली होती. परंतु, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा थेट फोन आल्यानंतर एम. के. देशमुख यांनीही निवडणुकीतून आपली माघार जाहीर केली आहे. भाजप नेते रामराव शेळके यांनी माध्यमांना दिलेल्या माहितीनुसार, देशमुखांच्या माघारीमुळे आता मराठवाडा पदवीधर निवडणुकीच्या रिंगणात सतीश चव्हाण हे महायुतीचे एकमेव आणि अधिकृत उमेदवार राहिले आहेत. राज्यभरातील या जागावाटपातील तडजोडीमुळे महायुतीने बंडखोरी यशस्वीपणे शमवली आहे.

## जनतेसाठी आंदोलन करणे ही अराजकता कशी?



**मुंबई :** सत्ताधाऱ्यांकडून 'हिंदू-मुस्लीम' करत देशभरात अराजकता माजवली जात आहे. मात्र, जनतेचा मतदानाचा हक्क हिरावला जाऊ नये म्हणून आम्ही आंदोलन केले, तर त्याला तुम्ही अराजकता म्हणणार का? असा सवाल काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. तसेच, हे कृत्य देशाच्या भविष्यासाठी आणि उद्याच्या लोकशाहीसाठी अत्यंत घातक असून, सरकारने लोकशाही संपवण्याचा विडा उचलला आहे, असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. विजय वडेट्टीवार म्हणाले की, राहुल गांधी यांच्यावर टीका करण्यासाठी भाजपने मोठी फौज उभी केली आहे. मात्र, राहुल गांधी हे वाघ आहेत आणि त्यांना घेरण्याचे काम भाजपकडून सुरू असले, तरी ते एकटेच सर्वांना पुरून उरत आहेत. त्यांच्या आजी-वडिलांचे रक्त या देशाच्या मातीत मिसळले आहे. जे इंग्रजांना कधीच घाबरले नाहीत, ते या व्यवस्थेला काय घाबरणार? असा जोरदार टोला त्यांनी भाजपला लगावला. विजय वडेट्टीवार म्हणाले की, मोदी सरकार इतक्या इरेस का पेटले आहे? १३ कोटी मते चोरीला गेल्याचे आता सिद्ध झाले आहे. संविधानाच्या चौकटीत न बसता ज्या ज्ञानेशकुमारांची नियुक्ती करण्यात आली, त्यांना हटवण्यासाठी आज संपूर्ण देशभरात आंदोलन होत आहे. 'इंडिया' आघाडीच्या नेत्यांच्या आंदोलनाला ज्या प्रकारे हाताळले जात आहे आणि काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांना ज्या प्रकारे त्रास दिला गेला, त्यावरून या सरकारने देशातील लोकशाही संपवण्याचाच जणू विडा उचलला आहे, असे स्पष्ट दिसते. सोशल मीडियावर सरकारवर टीकाविजय वडेट्टीवार म्हणाले की, विरोधी पक्षांच्या नेत्यांसह जनतेचे जे आंदोलन सुरू आहे, त्यावरून जनता राहुल गांधी यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असल्याचे दिसून येत आहे. सरकारने सोशल मीडियावर एखादी पोस्ट टाकली तरी जनता त्यांना शिव्या घालते, मात्र याची थोडीही लाज या सरकारला वाटत नाही. देशातील प्रमुख विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या आंदोलनावर लाठीचार्ज होत असेल, तर सामान्य माणसांच्या हालांची कल्पना न केलेलीच बरी. दिल्ली पोलिसांचा वापर विजय वडेट्टीवार म्हणाले की, देशातील सामान्य माणूस आपल्या हक्कासाठी रस्त्यावर आला, तर हे सरकार त्याला गोळ्या घालून पुरावे संपवेल, गुंड पाठवून त्याचे खून करेल आणि त्यांना संपवून टाकेल, हे करायलाही हे सरकार मागेपुढे पाहणार नाही, अशी भीती वडेट्टीवार यांनी व्यक्त केली. काँग्रेसच्या एवढ्या मोठ्या आंदोलनात दिल्ली पोलिसांचा वापर करून ते आंदोलन क्रूरपणे चिरडण्याचे आदेश दिले जात आहेत. मात्र, राहुल गांधी देशातील लोकशाही वाचवण्यासाठीच हा लढा देत आहे.

## SIR प्रक्रियेवर आदित्य ठाकरेंचे प्रश्न; 'मतदारांची नावे गेली कुठे?'

**मुंबई :** देशातील लोकशाही, मतदानाचा अधिकार आणि तरुणांच्या आंदोलनांवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी भाजपवर जोरदार टीका केली आहे. दिल्लीमध्ये आंदोलनासाठी जाणाऱ्या तरुणांना रोखले जात असल्याचा आरोप करत त्यांनी केंद्र सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. 'देशात इमर्जन्सी लागू केली आहे, पण इमर्जन्सी असल्याचे बोलण्याची हिंमत भाजपमध्ये नाही,' अशी टीका त्यांनी केली. तसेच सरकारला तरुणांची भीती वाटत असल्याचा दावा करत देशात लोकशाही शिल्लक राहिली आहे का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. दिल्लीमध्ये रेल्वे आणि मेट्रो सेवा बंद ठेवण्यात आल्याचा उल्लेख करत आदित्य ठाकरे यांनी तरुणांच्या आंदोलनाबाबत सरकारच्या भूमिकेवर टीका केली. देशभरातून तरुण केवळ मतदानाचा अधिकार आणि आपला हक्क मागण्यासाठी दिल्लीला जात असताना त्यांच्यावर गुन्हे दाखल करणे, लाठीचार्ज करणे आणि घरोघरी जाऊन अटक करणे, हे नेमके काय दर्शवते, असा सवाल त्यांनी केला. 'ही इमर्जन्सी नाही तर आणखी काय आहे?' असे म्हणत त्यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला. मुंबई किंवा महाराष्ट्रातून आंदोलनात सहभागी होण्यासाठी दिल्लीला जाणाऱ्या लोकांवरही गुन्हे दाखल होण्याची शक्यता असल्याबाबत पत्रकारांनी विचारले असता आदित्य ठाकरे यांनी सरकारवर टीका केली. मुंबई आणि महाराष्ट्राची भीती दिल्लीतील सत्ताधाऱ्यांच्या मनात असल्याचा आरोप त्यांनी केला. आंदोलनकर्त्यांना रोखणे, त्यांना ताब्यात घेणे आणि नजरकैदेत ठेवणे, या प्रकारांमधून सरकारची अस्वस्थता दिसत असल्याचे ते म्हणाले. देशात लोकशाही राहिलेली नसून भाजप सत्तेला चिकटून बसल्याचे चित्र दिसत असल्याची टीकाही त्यांनी केली. दिल्लीतील आंदोलनात शिवसैनिक सहभागी होणार का, या प्रश्नावर आदित्य ठाकरे यांनी देशभरात जिथे-जिथे आंदोलने होतील, तिथे शिवसैनिक सहभागी होतील, असे सांगितले. केवळ राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनीच नव्हे, तर देशप्रेम असलेल्या प्रत्येकाने आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले. भाजपच्या मनात देशप्रेम असेल, तर त्यांनीदेखील या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आव्हान त्यांनी दिले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात इंडिया आघाडीच्या वतीने आंदोलन आणि राष्ट्रपतींची भेट घेण्याच्या नियोजनावरही आदित्य ठाकरे यांनी भाष्य केले. ज्ञानेश कुमार यांनी पदावरून दूर व्हावे, अशी भूमिका त्यांनी मांडली. ज्ञानेश कुमार यांना पाठिंबा देणाऱ्यांवरही टीका केली.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १० ऑक्टोबर २०२६


## "शोधूया स्वत:ला... समजूया महाराष्ट्राला" : यशवंतराव चव्हाण सेंटरच्या विद्यार्थ्यांची कन्नडच्या शिवाजी महाविद्यालयाला भेट



**कन्नड :** यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई या संस्थेच्या वतीने राज्यातील युवकांसाठी "शोधूया स्वत:ला... समजूया महाराष्ट्राला" या इंट्रास्टेट युथ एक्सचेंज प्रोग्राम अंतर्गत नऊ दिवसीय अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील विविध भागातील संस्कृती, भाषा, साहित्य आणि सामाजिक कार्य समजून घेण्यासाठी हा विद्यार्थ्यांचा ग्रुप सध्या मराठवाड्याच्या दौऱ्यावर आला आहे.या दौऱ्याच्या नियोजनाचा एक भाग म्हणून या अभिसरण ग्रुपने आज कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयाच्या मराठी विभाग आणि भाषा संशोधन केंद्राला भेट दिली. मराठी भाषा, संस्कृती आणि ग्रामीण भागातील साहित्यिक चळवळ समजून घेणे हा या भेटीमागील मुख्य उद्देश होता.यावेळी महाविद्यालयाच्या मराठी विभागाने गेल्या काही वर्षात राबवलेल्या विविध उपक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये राज्यभरात प्रसिद्ध असलेली लोकनेते सहकार महर्षी बाळासाहेब पवार राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा, शेतकरी आणि शेतीला तसेच ग्रामीण साहित्य व संस्कृतीला केंद्रस्थानी ठेवणारा तिफण कविता महोत्सव, वाचन संस्कृती वाढवण्यासाठी सुरू केलेली पुस्तक भेट योजना, वाचन प्रेरणा दिन, तिफण पुरस्कार, कन्नड तालुका साहित्य सन्मान पुरस्कार, लेखक-वाचक मेळावा, दिपावली साहित्यिक स्नेह मेळावा यासारख्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. तसेच कन्नड तालुक्यातील साहित्यिकांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी राबवण्यात येणारा तालुका साहित्यिक उपक्रम, नवोदित लेखक-कवींच्या लेखनाला दिले जाणारे प्रोत्साहन आणि त्यांचे प्रसिद्ध लेखन याबाबत सविस्तर चर्चा झाली.महाविद्यालयातील संत तुकाराम अध्यासन केंद्राच्या माध्यमातून सुरू असलेले संशोधन कार्य, दरवर्षी दिला जाणारा तुका म्हणे पुरस्कार, आयोजित करण्यात येणारी राष्ट्रीय चर्चासत्रे, साहित्य लेखन स्पर्धा, विविध साहित्यिक कार्यशाळा आणि मराठी विभागातील प्राध्यापकांनी साहित्य क्षेत्रात दिलेले वाङ्मयीन योगदान याचीही माहिती विद्यार्थ्यांनी यावेळी घेतली.ग्रामीण भागातील एका महाविद्यालयात इतक्या मोठ्या प्रमाणात साहित्यिक कार्य सुरू असल्याचे पाहून अभिसरण ग्रुपमधील विद्यार्थ्यांनी आश्चर्य आणि आनंद व्यक्त केला. या भेटीने आम्हाला मराठी भाषा आणि मराठवाड्यातील साहित्यिक चळवळीची नवी ओळख झाली, अशी प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी दिली.याप्रसंगी मराठी विभाग व संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. शिवाजी हुसे व डॉ. रामचंद्र झाडे यांनी ग्रुपमधील विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि 'जगावेगळा बाप' हे पुस्तक भेट म्हणून दिले.

## इकरा पब्लिक स्कूलच्या जलतरणपटूंची जिल्हास्तरीय स्पर्धेत पदकांची दणदणीत कमाई!

**जळगाव :** जिद्द, मेहनत आणि अचूक प्रशिक्षणाच्या जोरावर इकरा पब्लिक स्कूलच्या जलतरणपटूंनी जिल्हास्तरीय शालेय जलतरण स्पर्धेत आपली छाप उमटवली.कोकीळ गुरुजी मनपा जलतरण तलाव, जळगाव येथे झालेल्या शालेय उर्वरित जिल्हा जलतरण, डायव्हिंग व वॉटर पोलो स्पर्धा २०२६-२७ मध्ये इकराच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत अनेक पदकांवर आपले नाव कोरले.अंडर-१४ गटात झकेरिया हिदायत खाटीक याने जबरदस्त कामगिरी करत १०० मीटर बटरफ्लायमध्ये सुवर्णपदक, ५० मीटर फ्रीस्टाईलमध्ये रौप्यपदक आणि ५० मीटर बटरफ्लायमध्ये कांस्यपदक पटकावले.तीन पदकांची ही शानदार कामगिरी करत त्याने विभागीय स्तरावर आपली दावेदारी मजबूत केली.अंडर-१७ गटातही इकराच्या जलतरणपटूंनी आपला दबदबा कायम ठेवला.तहा सोहेल खान याने २००, ४०० आणि ८०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये रौप्यपदकांची कमाई केली.याह्या हिदायत खाटीकने ५० मीटर फ्रीस्टाईलमध्ये सुवर्णपदक, तर ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोकमध्ये कांस्यपदक मिळवले.सराश शेख शकील यानेही ५० मीटर फ्रीस्टाईलमध्ये कांस्यपदक पटकावत संघाच्या पदकतालिकेत भर घातली.या यशामुळे इकरा पब्लिक स्कूलच्या जलतरणपटूंनी विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी आपली जागा भक्कम केली आहे.खेळाडूंच्या या उल्लेखनीय यशामागे क्रीडा शिक्षक आमिर खान यांचे नियोजनबद्ध प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि खेळाडूंची अथक मेहनत यांचा मोलाचा वाटा आहे.इकरा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.करीम सालार,जनरल सेक्रेटरी एजाज मलिक आणि प्राचार्य शेख शकील यांनी विजयी जलतरणपटू, क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन केले.तसेच आगामी विभागीय स्पर्धेतही इकराचे खेळाडू उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचा नावलौकिक उंचावतील,असा विश्वास व्यक्त करत सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

## कन्नड: अक्षरा गवळी कुस्ती स्पर्धेत विभागातून प्रथम



**कन्नड (अरुण थोरात) :** येथील सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयातील बारावी विज्ञान शाखेची विद्यार्थिनी अक्षरा केशव गवळी हिने 19 वर्षाखालील वयोगटातील व 67 किलो वजन गटात विभागातून प्रथम क्रमांक पटकवाला आहे.तिची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेकरिता निवड झाली आहे. यावेळी शालेय समिती अध्यक्ष तथा श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, कन्नड येथील कोषध्यक्ष बाबासाहेब मोहिते यांच्या हस्ते अक्षरा केशव गवळी व तसेच मार्गदर्शक क्रीडाशिक्षक अजित खंबाट यांचा छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. तिला चिखलठान जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील क्रीडा शिक्षक विजयसिंह बरवाल यांनी प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले आहे. यावेळी बाबासाहेब मोहिते म्हणाले की, ग्रामीण भागातील मुलांमध्ये उपजत क्षमता असतात, त्या क्षमतांना व सुप्त गुणांना शिक्षकांनी शिक्षकांनी हेरून, त्यासंदर्भात संधी उपलब्ध करून दिली पाहिजे, आपले ग्रामीण मुले कशातच कमी नाही, कमी आहे ती संधीची. यावेळी संजय जाधव, जयश्री सोनार, विजय भोसले, हरिचंद्र शेवरे, रामनाथ टेकाळे, गणेश विसपुते, संतोष रिंढे, कालिदास शेवाळे, संजय त्रिभुवन, मीनाक्षी पाटील, ज्योती बिरारे, वैशाली सोळुंके, निलेश देशमुख, महेंद्र बाविस्कर, नारायण पूजरोड, संजय गोरे, नरेंद्र शेजवळ सह शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १० ऑक्टोबर २०२६

## समाजसेविका सौ बेबीता ताई यांची निरगुडी बु.ठाकरवाडी येथे सदिच्छा भेट; सामाजिक प्रश्नांवर चर्चा



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद तालुक्यात असलेल्या निरगुडी बु. ठाकरवाडी येथे समाजसेविका बेबीता ताई (भावली ता इगतपुरी) यांनी आदिवासी ठाकर समाजबांधवांची सदिच्छा भेट घेतली.या भेटीदरम्यान समाजातील विविध समस्या, सामाजिक प्रश्न आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासंदर्भात चर्चा करण्यात आली.या भेटीच्या माध्यमातून बेबीता ताई यांनी ठाकर समाजबांधवांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी आणि प्रश्न जाणून घेतले.आदिवासी समाजाच्या विकासासाठी जल जंगल जमीन व शिक्षण, आरोग्य, रोजगार,वन पट्टे धारक, वन जमिनी मूलभूत सुविधा तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ समाजातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.ग्रामीण आणि दुर्गम भागात वास्तव्यास असलेल्या आदिवासी ठाकर समाजाच्या विकासासाठी सामाजिक एकता, जनजागृती आणि संघटित प्रयत्नांची गरज आहे. समाजातील समस्या सोडविण्यासाठी समाजबांधवांनी एकत्र येऊन संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि समाजाच्या प्रगतीसाठी सकारात्मक दृष्टिकोनातून प्रयत्न करणे, हे या भेटीचे महत्त्वाचे उद्दिष्ट ठरले.यावेळी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक एकता, शिक्षणाचे महत्त्व, युवकांचा सहभाग आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी यांसारख्या विषयांवर चर्चा करण्यात आली. समाजातील नागरिकांनी एकत्र येऊन आपल्या समस्या मांडाव्यात तसेच समाजाच्या उन्नतीसाठी संघटितपणे प्रयत्न करावेत, यावरही भर देण्यात आला.समाजसेविका बेबीता ताई यांच्या या सदिच्छा भेटीमुळे समाजबांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. अशा भेटींमुळे समाजातील प्रश्नांना वाचा फोडण्यास, परस्पर संवाद वाढविण्यास आणि सामाजिक सलोखा मजबूत करण्यास मदत होते.यादरम्यान रंगनाथ मेंगाळ, सनिराम गावंडे, बबन कातवारे सोमनाथ मेंगाळ, बाळू मधे, सोमिनाथ मेंगाळ, लक्ष्मण मेंगाळ, पांडुरंग मधे,जनाबाई मधे,पुनम मेंगाळ,तुकाराम मेंगाळ, तुकाराम बांगारे, रामचंद्र मधे,बुधा मधे,सखुबाई मधे ,वंदना मेंगाळ,वाळूचा मेंगाळ,व ठाकर समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते आदिवासी ठाकर समाजाच्या विकासासाठी समाजातील प्रत्येक घटकाने एकजुटीने पुढाकार घेणे गरजेचे असून, अशा संवादातून समाजाच्या प्रगतीला नवी दिशा मिळू शकते.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
■ प्रोजेक्ट रिपोर्ट ■ डेझर्टेशन
■ पीएच.डी./एम.फिल.थेसिस ■ कलर प्रिंट
■ डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट ■ स्कॅनिंग
■ स्पायरल व हार्ड बायडींग ■ लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

## कला महाविद्यालय बिडकीन येथे भारत सरकार च्या 'पसारा 'कायदा अंतर्गत पर्मनंट सुरक्षा रक्षक भरतीला भव्य प्रतिसाद:




**बिडकीन :** सूक्ष्म लघु मंत्रालय भारत सरकारच्या उपक्रमांतर्गत आणि भारत सरकारच्या पसारा ऍक्ट 2005 च्या नियमाप्रमाणे स्थानिक तरुणांसाठी कायमस्वरूपी नोकरीसाठी आयएसओ मान्यताप्राप्त , भारत सरकारच्या पसारा मान्यताप्राप्त शिवस्वराज्य सेक्युरिटी अँड मॅन पॉवर सर्विसेस प्रा. लिमिटेड आणि एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचालित, कला महाविद्यालय, बिडकीन, प्लेसमेंट सेल आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने... दिनांक 07 ऑक्टोबर 2026 ते 10 ऑक्टोबर 2026 पर्यंत सुरक्षा रक्षक भरतीचे आयोजन करण्यात आले आहे. आज भरतीचे उदघाटन कला महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. नितिन आहेर, एस. एस. सिक्युरिटी प्रायव्हेट लिमिटेडचे सीएमडी अमोल सिंगनाथ साहेब, कला महाविद्यालय बिडकीन प्लेसमेंट शसेलचे अध्यक्ष डॉ. रमेश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यक्रम अधिकारी प्रा. मिलिंद ठोकळे यांच्या हस्ते महापुरुषांच्या विचारांना अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्लेसमेंट सेलचे अध्यक्ष डॉ. रमेश गायकवाड यांनी केले डॉ.रमेश गायकवाड यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये महाविद्यालयांमध्ये वेगवेगळे सेल कार्यरत असून बिडकीन सारख्या शहरांचे नाव जगाच्या नकाशावर कोरले जाणार आहे डी.एम.आय.सी च्या माध्यमातून अनेक नामांकित कंपन्या बिडकीन मध्ये येऊन बिडकीन शहराचा कायापालट होत आहे यामध्ये या भागातील तरुणांना रोजगार मिळावा, नोकरी मिळावी या दृष्टिकोनातून भरती अभियान राबवण्यात आले आहे यामुळे आपल्या महाविद्यालयातील आजी-माजी विद्यार्थी व या पंचक्रुशीतील सर्व युवकांना रोजगाराच्या संध्या भविष्यामध्ये निर्माण होतील यासाठी महाविद्यालय नेहमी बिडकीन शहराच्या विकासाच्या दृष्टीने आणि येथील युवकांना नोकरीच्या संधी मिळवून देण्यासाठी सदैव तत्पर आहे असे स्पष्ट केले तदनंतर एस एस सिक्युरिटी प्रायव्हेट लिमिटेड चे सीएमडी अमोल सिंगनाथ यांनी आपण कला महाविद्यालया आणि एस. एस. प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने सुरक्षा रक्षक भरती राबवत असताना येथील विद्यार्थ्यांचा आणि महाविद्यालयातील प्राचार्य व प्राध्यापकांचे सहकार्य बघून अतिशय मनस्वी आनंद झाला आहे आणि याचा फायदा या भागातील विद्यार्थी विद्यार्थिनींना त्याचबरोबर परिसरातील युवक युवतींना होईल त्याचबरोबर आपण केवळ सेक्युरिटी म्हणजे वॉचमन नसून आपण महाराष्ट्र सेक्युरिटी बोर्ड त्याचबरोबर फक्त सिक्युरिटीज न राहता आपल्या कलागुणांना वाव देऊन व आपल्या शिक्षणाानुसार च्या विभागांमध्ये आपण काम करणार आहोत तेथे आपली पदोन्नती होऊ शकते सिक्युरिटी सुपरवायझर, फिल्ड ऑफिसर, डायरेक्टर अशा वेगवेगळ्या पदावर आपण कष्टाच्या आणि मेहनतीच्या जोरावर वीस हजार ते एक लाख रुपया पर्यंत पगार मिळू शकतो असे बहुमुल्य मार्गदर्शन केले .शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य, डॉ.नितीन आहेर सर यांनी या कार्यक्रमाचे आणि एस. एस. सिक्युरिटी प्रायव्हेट लिमिटेड चे सी.एम.डी.अमोल सिंगनाथ, भरती अधिकारी गोरख जगताप, सहायक्क भरती अधिकारी महेश कुमार सरतापे यांचे स्वागत आणि कौतुकही केले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बिडकीन हा ग्रामीण भाग असून येथील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत या दृष्टिकोनातून आमचे महाविद्यालय नेहमीच प्रयत्न करत असते म्हणून एस. एस. सिक्युरिटी प्रायव्हेट लिमिटेड यांनी प्रत्येक वर्षी आमच्या महाविद्यालयात अशा प्रकारच्या मेगा भरतीचे अभियान घेऊन येथील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात यासाठी आपणास लागेल ते सर्वतोपरी सहकार्य महाविद्यालयाच्या माध्यमातून आम्ही करायला तयार आहोत असे वचन दिल्यामुळे विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवून महाविद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. मिलिंद ठोकळे यांनी धडाकेबाज केले आणि कार्यक्रमाला रंगत भरली त्याचबरोबर या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महाविद्यालयातील हिंदी विभाग प्रमुख डॉ. शेख मुखत्यार यांनी केले . कार्यक्रमाला महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक डॉ.प्रसाद करंदीकर सर, डॉ.सय्यद सर डॉ.मोहसीन सर डॉ. काळे अंजली मॅडम आणि इतर सर्व सहकारी प्राध्यापक मित्रांनी सहकार्य केल्यामुळेच हा कार्यक्रम यशस्वी पार पडला या कार्यक्रमाच्या नियोजनामध्ये आणि एकूणच व्यवस्थेमध्ये महाविद्यालयातील सेवक नसीर भाई शेख यांनी अतिशय मेहनत घेतली शेवटी राष्ट्रगीत घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या भरतीमध्ये बेरोजगार युवकांना पर्मनंट नोकरी दिली जाणार आहे. त्याचबरोबर. प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेच्या(PMVBRY) अंतर्गत नवीन भरती होणाऱ्या युवकांना नोकरी लागल्यानंतर 15000 रुपये मिळतील. जे पेमेंट व्यतिरिक्त सरळ त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा होतील. तसेच इतर सुविधा ज्यामध्ये पी एफ सुविधा, मेडिकल, ग्रॅज्युटी, पी एफ पेन्शन, विधवा पेन्शन, अनाथ पेन्शन व नियमानुसार भत्ते दिले जातील, तसेच पेमेंट हे महाराष्ट्र गार्ड बोर्ड किंवा महाराष्ट्र मिनिमम वेज नियमाप्रमाणे पेमेंट मिळणार आहे जे 15 हजार ते 24हजार पर्यंत सुरुवातीस मिळेल व सर्व सुविधा दिल्या जातील. भरती होणाऱ्या तरूणांना महाराष्ट्रामध्ये मध्ये नोकरी दिली जाणार आहे,

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १० ऑक्टोबर २०२६


## अभिजात मराठीला आधुनिकतेशी जोडून तिचे वैशिष्ट्य जगासमोर मांडा!



**छत्रपती संभाजीनगर :** आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात समाज झपाट्याने बदलत आहे. समाजमाध्यमांचा वाढता प्रभाव आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या विस्ताराच्या पार्श्वभूमीवर संशोधक विद्यार्थी, मराठी भाषेचे अभ्यासक आणि तरुण साहित्यरसिकांनी अभिजात मराठी भाषेला आधुनिकतेशी जोडून तिचे वैशिष्ट्य नव्या परिप्रेक्ष्यातून जगासमोर मांडण्याची गरज आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक व संपादक डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील मराठी भाषा व वाङ्.मय विभागातफे आयोजित अभिजात मराठी भाषा सप्ताहाचा समारोप आणि पदव्युत्तर प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभानिमित्त ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख प्रा. डॉ. रमेश जाधव होते. यावेळी अध्यक्षीय समारोप करताना प्रा. डॉ. रमेश जाधव यांनी मराठी भाषा व वाङ्.मय विभागाच्या वैभवशाली परंपरेचा आढावा घेतला. या परंपरेची माहिती विद्यार्थ्यांना करून देत त्यांनी, विद्यार्थ्यांनी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी, संशोधनासाठी आणि साहित्याच्या अभ्यासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहावे, असे आवाहन केले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'भावतरंग या भित्तिपत्रकाचे विमोचन डॉ. शिवाजी हुसे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय ध्वनिचित्रफीत( रील) स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. तसेच अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त आयोजित अभिवाचन कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. दुपारच्या सत्रात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सानिया बेग यांनी केले, तर मेघा मसलकर यांनी आभार मानले. या प्रसंगी डॉ. दासू वैद्य, डॉ. आकाश पवार, डॉ. बाळासाहेब गायकवाड, डॉ. वाल्मीक वाघमारे डॉ. रामेश्वर वाकणकर यांच्यासह विभागातील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्ञानेश्वर माउलीच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## “प्रश्न पडतात तेव्हा पत्रकारिता जन्माला येत असते” जेष्ठ समीक्षक श्री. श्रीपाद अपराजित




**नागपूर :** डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संयुक्त भाषा अध्ययन मंडळाचे उदघाटन संपन्न “ भाषा ही संवादाचे प्रभावी माध्यम आहे. संवाद हा विचारांची देवाण घेवाण करणारा असावा. संवाद हा एकांगी आणि एकतर्फी नसावा. संवादातूनच मानवी मनाला प्रश्न पडतात. प्रश्न जेव्हा पडतात तेव्हा पत्रकारिता जन्माला येत असते आणि कर्तव्य निष्ठ आणि प्रामाणिक पत्रकारितेतूनच राष्ट्राची उभारणी होत असते." असे परखड प्रतिपादन जेष्ठ संपादक श्रीपाद अपराजित यांनी केले. महाविद्यालयात मराठी, हिंदी, इंग्रजी आणि पाली- प्राकृत भाषा विभागाच्या वतीने आयोजित संयुक्त भाषा अध्ययन मंडळाचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. आजच्या अस्वस्थ वर्तमानातील दुरावत जाणारी मानवी संबंधांची दरी, युवा पिढीतील तुटत चाललेला संवाद , पत्राकरितेपुढील आधुनिक आव्हाने यावर त्यांनी चिंता व्यक्त केली आणि सोबतच पत्रकारितेचा प्रदीर्घ प्रवास, संपादक कारकीर्दीतील काही निवडक प्रसंग यावर देखील भाष्य केले. त्यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील यांनी मैत्रीतून माणूस घडतो . भाषा हाच जीवनाचा आत्मा आहे. असे मार्गदर्शनपर विचार व्यक्त केले. याप्रसंगी इंग्रजी, मराठी, हिंदी आणि पाली प्राकृत विभाग प्रमुख अनुक्रमे डॉ. सुदेश भोवते, डॉ. मनिषा नागपुरे, डॉ. सुमेध नागदेवे आणि डॉ. प्रोणोती सहारे यांची प्रामुख्याने विचारपीठावर उपस्थिती होती. चारही भाषेच्या अध्ययन मंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष आणि इतर पदाधिकारी यांचा सत्कार याप्रसंगी करण्यात आला. कार्यक्रमाचा उद्घोष विद्यापीठ गीताने झाला. मान्यवरांचे स्वागत संगीत विभागाचे समन्वयक डॉ. वानखेडे यांच्या मार्गदर्शनात बी. ए. भाग २ च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वागतगीतातून करण्यात आले. पुष्प रोपटे आणि शाल देऊन प्रमुख अतिथि यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विविध भाषा विभागांच्या वतीने काव्यवाचन विद्यार्थ्यांनी केले. प्रथम राष्ट्रकवी मैथिली शरण गुप्त रचित ‘ मनुष्यता ’ ही जाज्वल्य कविता हिन्दी भाषेच्या विद्यार्थ्यांनी सादर केली. मराठी मातृभाषेचा अभिमान आणि सन्मान प्रतिध्वनीत करणारी ‘मायमराठी आमुचि ’ या कवितेचे वाचन मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी केले. अमेरिकन मानवाधिकार पुरस्कर्ता मेंया ओगलेवू यांची उत्तुंग आशावाद प्रतिबिंबित करणारी ‘Still I Rise’ ही कविता इंग्रजी विभागाच्या वतीने सादर करण्यात आली. तर आध्यात्मिकतेतून मनाला नियंत्रित करण्याचे सामर्थ्य व्यक्त करणाऱ्या बुद्धप्रणीत पाली साहित्यातील गाथेचे पठन पाली प्राकृत च्या विद्यार्थ्यांनी याप्रसंगी केले. डॉ . मेघा रामटेके यांच्या मार्गदर्शनात चार ही भाषांच्या अध्ययन मंडळा तील नवनिर्वाचित पदाधीकाऱ्यांना कर्तव्यनिष्ठ ची शपथ देण्यात आली. भाषा अध्ययन मंडळ स्थापनेचा उद्देश आणि कार्यप्रणाली यावर प्रास्ताविक भूमिका डॉ. सुमेध नागदेवे यांनी विषद केली. सोबतच प्रमुख अतिथी जेष्ठ संपादक आणि समीक्षक श्री . श्रीपाद अपराजित यांचा परिचय सभागृहास करून दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनिषा नागपुरे यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ. अमोल मेंढे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. अमृता डोरलीकर, डॉ . तरन्नुम खान , प्रा. प्रियंका मेश्राम , डॉ. सना कौसर , प्रा . बावणे , प्रा. धोंगे डॉ. ज्वाला डोहाणे आणि विभागातील सर्व सहकारी प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रम महाविद्यालय प्रथेनुसार राष्ट्रगीताने संपन्न झाला.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १० ऑक्टोबर २०२६


## शब्दरंगी नाना

निर्भिड विचारांची तोफ,
अचानक कसे थंडावली.
शेतकऱ्यांसाठी तेवणारी,
वात जळतांना मंदावली. १

शब्दात अंगार भरून,
शब्दातून दम भरणारा.
सडेतोड विचार मांडून,
सत्तेला धारेवर धरणारा. २

सत्याला पाठबळ देताना,
शब्दाला शस्त्र करणारा.
शेतकऱ्यांच्या सुखासाठी,
तन मन धनाने लढणारा. ३

शब्द शब्द पेटवून मनात,
व्यवस्थेला खवळून भांडले.
शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी,
नाम फाउंडेशनही काढले. ४

शेवटच्या श्वासापर्यंत असा,
बळीराजासाठी नाना जागले.
क्रांतिकारी विचारातून पुन्हा,
शासनालाही हिशोब मागले. ५

आता शब्दरंगी उरला नाना,
कायम शब्दरूपी संवादात.
निर्भिड कठोर शब्द नानाचे,
आजही घुमतात मनामनात. ६

अस्त एका सूर्याचा अचानक,
मनाला चटका लावून गेला.
प्रेक्षकांच्या मनावर मिळवलेले,
राज्य काळाने हिरावून नेला. ७

नाना तुझ्या विचारांना आज,
करतो मनोभावे सादर प्रणाम.
शब्दरूपी श्रद्धांजली वाहून,
करतो तुझ्या विचारांना सलाम. ८



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात बॉक्सिंग व किक बॉक्सिंग स्पर्धा यशस्वीपणे संपन्न



**फुलंब्री** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने आंतरमहाविद्यालयीन बॉक्सिंग व किक बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.या स्पर्धेच्या उदघाट्न सोहळ्यासाठी उदघाटक म्हणून श्री मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर येथील प्राचार्य, डॉ. रामराव चव्हाण उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री निवृत्ती पा. गावंडे यांची उपस्थिती होती. सोबत प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांचीही उपस्थिती होती. उदघाटन प्रसंगी बोलत असताना डॉ. रामराव चव्हाण म्हणाले की, कोणताही खेळ मन, बुद्धी आणि शरीर यांना मजबूत करणारा असतो. खेळामुळे एकोप्याची व राष्ट्रीय भावना निर्माण होण्यास मदत होते. त्यामुळे आपण कोणत्या ना कोणत्या खेळाकडे वळले पाहिजे. असे म्हणत उपस्थित खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. यावेळी विविध महाविद्यालयातून आलेले क्रीडा शिक्षक व पंच उपस्थित राहिले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केले. तर आलेल्या पाहुण्यांचा परिचय महाविद्यालयातील क्रीडा शिक्षक डॉ. संदीप जगताप यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी केले.यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# नाना पाटेकर यांच्या मृत्यू प्रकरणात पोलिसांचा तपास:गोवा पोलिसांनी अप्राकृतिक मृत्यूची नोंद केली;

**पुणे** : गोवा पोलिसांनी ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाच्या प्रकरणात वैद्यकीय-कायदेशीर 'अप्राकृतिक मृत्यू' (UD) चा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. रुग्णालय प्रशासनाच्या माहितीनुसार, त्यांना मृतावस्थेत रुग्णालयात आणण्यात आले होते. त्यामुळे पोलिसांत गुन्हा दाखल करणे आवश्यक होते. दरम्यान, पुण्यातील फार्महाऊसमध्ये रात्री उशिरा झालेल्या अंत्यसंस्कारांबाबत मुलगा मल्हार पाटेकर यांनी परिस्थिती स्पष्ट केली आहे. त्यांनी सांगितले की, गोव्याहून पार्थिव शरीर आणण्यास झालेला विलंब आणि सकाळीच निधन झाल्यामुळे कुटुंबीयांनी त्याच दिवशी अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय घेतला. गोवा पोलिसांनी दाखल केला अप्राकृतिक मृत्यूचा गुन्हा वृत्तसंस्था IANS च्या माहितीनुसार, गोवा पोलिसांनी BNS च्या कलम १९४ अंतर्गत गुन्हा दाखल केला असून PSI नितीन नाईक या प्रकरणाचा तपास करत आहेत. पणजी येथे दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याच्या अहवालानुसार, नाना पाटेकर यांना डोना पाउला येथील ओशन पार्कमधून बांबोळीतील मणिपाल रुग्णालयात आणण्यात आले होते. तेथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलीस शवविच्छेदन अहवाल आणि कुटुंबीयांच्या जबाबांची तपासणी करणार आहेत. मणिपाल रुग्णालयाच्या ऑन्कोलॉजी विभागाचे प्रमुख डॉक्टर शेखर साळकर यांनी सांगितले की, नाना पाटेकर यांना रुग्णालयात मृतावस्थेतच आणण्यात आले होते. त्यामुळे नियमानुसार पोलिसांत गुन्हा नोंदवावा लागला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी गोवा मेडिकल कॉलेजच्या शवागारात पाठवण्यात आला. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, प्राथमिकदृष्ट्या हे हृदयक्रिया बंद पडण्याचे प्रकरण दिसत आहे. त्यांनी सांगितले की, नाना पाटेकर यांना यापूर्वीपासूनच हृदयविकाराचा त्रास होता आणि त्यांच्यावर उपचार सुरू होते. वृत्तसंस्था ANIशी बोलताना मुलगा मल्हार पाटेकरने रात्री उशिरा अंत्यसंस्कार करण्यामागचे कारण सांगितले. साधारणपणे सूर्यास्तानंतर अंत्यसंस्कार केले जात नाहीत, मात्र मल्हारने सांगितले की कुटुंबीय गोव्यात होते आणि पार्थिव शरीर पुण्यातील गावातील फार्महाऊसवर आणण्यासाठी वेळ लागला. निधन सकाळी लवकर झाले होते आणि बराच वेळ उलटून गेला होता, त्यामुळे कुटुंबीयांनी गुरुवारीच अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय घेतला. वडिलांचे व्हिजन आणि 'नाम फाउंडेशन'चे काम सुरू राहणार मल्हार पाटेकर यांनी सांगितले की, नाना साहेबांसारखी माणसे आपल्या कर्तृत्वामुळे सदैव अमर राहतात. त्यांनी सांगितले की, मराठवाड्यात 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून सुरू असलेली सामाजिक कामे बंद होणार नाहीत. यासंदर्भात त्यांची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली असून, हे काम सीईओ गणेश थोरात यांच्या देखरेखीखाली वेगाने पुढे नेले जाईल. गुरुवारी रात्री पुण्यातील डोंजे गावातील फार्महाऊसवर नाना पाटेकर यांच्यावर पूर्ण शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलिस दलाने त्यांना 3-गन सलामी दिली. यावेळी अभिनेता जॅकी श्रॉफ, दिग्दर्शक अनिल शर्मा, अनीस बज्मी आणि निर्माता फिरोज नाडियाडवाला यांच्यासह अनेक चित्रपट क्षेत्रातील व्यक्ती आणि राजकारणी शोकाकुल कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी व श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी पोहोचले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १० ऑक्टोबर २०२६


# सुखनाचा लढाऊ सैनिक : सोपान कोळकर

सुखना नदी ही छत्रपती संभाजीनगरातील एक महत्वाची नदी आहे. चौका सारोळा - कोलठाण शिवारातून ती ऊगम पावते. पुढे जालना जिल्हयातील अंबड तालुक्यात साडेसावंगी येथे दुधनाला मिळते. सुखना - दुधना - लहुकी असा त्रिवेणी संगम या भागात पहावयास मिळतो. या नदीकाठच्या गावांचे दोन भाग पडतात. एक ऊगम ते सुखना मध्यम प्रकल्प गारखेडा धरण. तर दुसरा भाग म्हणजे धरणाखालची गावे. याच खालच्या भागात सुखना नदीकाठी वसलेले एक गाव आहे, वाकुळणी हे बदनापूर तालुक्यात येते. वाकुळणी - भायगाव असे ही या परिसरास ओळखले जाते. वाकुळणी व माहेर भायगाव या गावात फक्त सुखना नदी आडवी आहे. वाकुळणी बदनापूर तर माहेर भायगाव अंबड तालुक्यात. तसा हा परिसर म्हणजे अंबड, बदनापूर, पैठण आणि छत्रपती संभाजीनगर अशा चार तालुक्याच्या सीमेवरचा आहे. जालना व छत्रपती संभाजीनगर या दोन जिल्हयांना जोडणारा . सीमेवरची गावं असल्यामुळे विकास व परिवर्तनाच्या प्रक्रियेपासून कायम कोसो दूर असलेली. कायम दुष्काळी व अवर्षण प्रवण भाग. आडमार्गी भाग म्हणूनही परिचित. बीड व जालना राष्ट्रीय महामार्गाच्या मध्यभागी असलेला हा भाग आहे. या भागाचा फार काही विकास झालेला नाही. याच सुखना नदीकाठी वाकुळणी या गावात एका सामान्य शेतकरी - शेतमजुर कुटूंबात जन्मलेले सोपान कोळकर हा एक उमदा, जिद्दी व ध्येयवादी युवक. घरची परिस्थिती जेमतेम. वडिल सालगडी म्हणून काम करायचे. अशा प्रतिकुल परिस्थितीत धडपड करणारा एक युवक म्हणूनही त्याची या भागात ओळख आहे. शिक्षण याच गावात झाले. सामाजिक कार्याची त्यास मुळातून आवड आहे. सुखना नदीकाठच्या गावाशी तो याच कारणाने जोडलेला एक हाडाचा सामाजिक कार्यकर्ता ही आहे. छोटे मोठे कामे करून तो धडपडायचा. लॉकडाऊन नंतर सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समितीची स्थापना मी केल्यानंतर तो या चळवळीशी व माझ्याशी कायम जोडला गेला. वास्तविक माझा व त्यांचा परिचयही नव्हता. कुणाकडून तरी माझा फोन नंबर घेऊन त्यांनी मला त्यावेळी फोन करून तुमच्या सोबत मला काम करावयाचे आहे. अशी ईच्छा त्यांनी व्यक्त केली. तेव्हापासून मी गावाकडे गेलो की तो हमखास भेटायला येतोच. अर्थात भेटीची ओढ व कारणही असते सुखना नदी, शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न, पर्यावरण व निसर्ग संवर्धन. आमच्या या समान आवडीमुळे तो या चळवळीशी जोडला गेला. सध्या तो मुक्त विद्यापीठाच्या पत्रकारितेचा कोर्स चे शिक्षण घेत आहे. अतिशय उत्साही, बोलका, अभ्यासू आणि लेखन वाचनाची त्याला प्रचंड आवड आहे. सामान्य कुटूंबात जन्म झाला, गरिबी अनुभवली, मान अपमान सहन केला. सामान्य माणसांच्या वाटयाला हे जगणं येऊ नये. त्यांचे प्रश्न सोडून त्यांच्या सुखदु:खात सहभागी होऊन त्यांच्या सुखदुःखाचा वाटेकरी व्हावे या हेतूने तो कायम लोकांचे कामे करीत असतो. लोकांच्या मदतीला धाऊन जातो. विविध धार्मिक , सामाजिक कार्यात सहभागी होतो. प्रचंड स्वाभिमानी असलेला हा सोपान बुलंद छावा या संघटनेचा ही एक कार्यकर्ता आहे. सुखना नदीच्या संवर्धनात व नदी विषयक उपक्रमात तो सातत्याने माझ्या सोबत कार्यरत असतो. अधून मधून फोन करून कायम संपर्कात असतो. गावाकडील प्रश्न, वाळू उपसा, अतिक्रमण, पाऊसपाणी, याची माहिती तो मला देत असतो. सुखना नदी हा त्याचा ध्यास आहे. दिवसभरात तो कुठेही असला तरी सुखना नदीवर त्यांच्या दोन चार चकरा दिवस भरात होतातच. नदीप्रेम हे त्याच्यात ओतप्रोत भरलेले आहे. सातत्याने नदी समस्या या विषयी तो लिहितो आवाज उठवितो. आता पर्यंत सुखना नदी संवर्धनासाठी जे जे कार्यक्रम झाले त्यात त्याचा सहभाग लक्षणीय राहिला आहे. गावा शिवारातील युवक, शेतकरी विद्यार्थी यांना तो नदी संवर्धनाचे धडे देतो. नदीशी जोडण्याचे आवाहन करतो. शासन दरबारीही आवाज उठवितो. वाकुळणी - माहेर भायगाव शिवारात त्यांनी सुखना नदी बचाव चळवळ गतिमान केली आहे. केवळ पदासाठी, फायद्यासाठी नाही तर सुखना नदी वाचली पाहिजे हा त्याचा प्रयत्न असतो. त्याच्या वागण्या बोलण्यात कायम सुखना ओतप्रोत ओसंडून वाहते. खरं तर गावोगावी नदी व पर्यावरणावर प्रेम करणारी माणसं, युवक तयार झाली पाहिजे. सोपान कोळकर मला आजच्या युवा पिढीचा नायक वाटतो. उत्तम समज, सामाजिक आकलन, सामाजिक प्रश्नांची जाण व भान असलेला हा ध्येयवादी युवक आहे. ग्रामीण भागात अशा युवकांची खरी गरज आहे. आपल्या चरितार्थासाठी व आवड म्हणून तसेच सामाजिक काम म्हणून त्याने एक रोपवाटिका ही या भागात सुरू केली आहे. शेतकऱ्यांना, युवकांना तो नेहमी मार्गदर्शन करतो. आपल्या मुलांवरही नदी व पर्यावरणाचे संस्कार व्हावेत, ते नदी व निसर्गाशी जोडले जावे हा त्यांचा सातत्याने प्रयत्न असतो. दिवाळीला नदीत पणती ठेवून नदीची आठवण ठेवणारा व हा सण साजरा करणारा तो एक सजग नागरिक ही आहे. सध्या एका दैनिकात पत्रकार म्हणूनही तो काम करतो आहे. या माध्यमातून लोकांचे प्रश्न सोडवतो, त्यांचे प्रबोधनही करतो. सोपान कोळकर सुखनाचा एक लढाऊ सैनिक व कार्यकर्ता म्हणून आपल्या सुखना नदीसाठी संघर्ष करीत आहे. गावोगावी अशा ध्येयवादी सामाजिक कार्यकर्त्यांची आज गरज आहे. त्यांचा लोकसंपर्क ही दांडगा आहे. माणसं जपणारा व माणसं जोडणारा हा समाजप्रेमी युवक आहे. त्यांचा जीवन प्रवास खडतर व संघर्षाचा तितकाच कष्टाचा ही आहे. अशाही परिस्थितीत तो आपल्या सुखना मायची सेवा करतो आहे. अजून तो धडपडतो चाचपडतो आहे. कधीतरी त्याला आपला मार्ग सापडेलच. मात्र या वाटेने चालतांना तो सुखनाशी नाते कायम ठेवील असा मला विश्वास आहे. ज्यांना सुखना नदी पहावयाची त्यांनी त्या परिसरात गेल्यावर त्याची भेट आवर्जून घ्यावी.सामाजिक कार्याची त्याला मुळातूनच आवड आहे. समाजकार्य, तसेच विविध सामाजिक संघटनांमध्ये त्यांचा क्रियाशिल सहभाग सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. निसर्ग संवर्धन विशेषत: नद्या संवर्धनासाठी सामाजिक चळवळीत तो सक्रिय आहे.शेतकरी- शेतमजूर तसेच समाजातील उपेक्षितांच्या प्रश्नांना वाच्या फोडण्यासाठी तो कार्यरत असतो. असा स्वयंसेवी कार्यकर्ता व नदी प्रेमी युवक म्हणून सोपान कोळकर यांचे कार्य लाखमोलाचे आहे. आपल्या या वाटचालीविषयी तो म्हणतो -" माझा जन्म खेड्यातील असल्याने खेड्यातील जनजीवन मी जवळून अनुभवलंय.बापाने गरिबीशी केलेले दोन हात मला माझ्या आयुष्यात संघर्ष कारण्यासाठी बळ देते. या खेड्यातील लोकांच्या दैनंदिन जीवनातील समस्या कायमच त्यांच्या पाचवीला पूजलेल्या आहेत.आपला भारत देश कृषी प्रधान आहे परंतु या शेतकऱ्याला समाजात यथोचित सन्मान मिळत नाही. या मातीशी ऋणानुबंध असल्याने मी तिच्या कृतज्ञतासाठी लोकांच्या प्रश्नांचे निस्वार्थ निराकरण करण्यासाठी छोटासा प्रयत्न असताना डॉ.शिवाजी हुसे यांच्या संपर्कात आलो त्यांची चाकोरीच्या बाहेरील समाजसेवा आपल्या जन्मभूमीविषयी असलेली तळमळ पाहून मला आणखीनच प्रेरणा मिळाली. या प्रेरणेतूनच मी त्यांच्याशी जोडला गेलो.सुखना नदी हा माझा श्वास व जगण्याचा एक भाग आहे. तिच्या अस्तित्वासाठी मी संघर्ष करीत राहिल. इथूनपुढेही हे कार्य मी अखंडपणे चालू ठेवणार आहे. सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समिती चा मी एक लढाऊ सैनिक आहे. सुखना नदीशी माझे आत्मिक प्रेम आहे. या चळवळीने मला सामाजिक भान दिले. "असे सामाजिक भान असलेले युवक आज आपणास हवे आहेत. युवकांनी त्यांचा आदर्श घ्यावा.

**(संपर्क : सोपान कोळकर , वाकुळणी मो.94041 67777 ) —**

**प्रा. डॉ. शिवाजी हुसे ( ' सुखनाकाठची माणसं ' या लेखमालेतील लेख)**


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक

या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १० ऑक्टोबर २०२६

## जात वैधता प्रमाणपत्रासाठी पैशांची मागणी होत असल्याचा आरोप, संबंधितांची हकालपट्टी करा !



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, छत्रपती संभाजीनगर येथे जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांची अडवणूक केली जात असून, संचिका निकाली काढण्यासाठी ३० हजार, ५० हजार ते एक लाख रुपयांपर्यंत पैशांची मागणी होत असल्याचा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीप्रणीत सम्यक विद्यार्थी आंदोलनाने केला आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधित समिती अध्यक्ष आणि कंत्राटी कर्मचारी सोमनाथ चव्हाण यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अक्रम खान यांनी बार्टी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे. या संदर्भात सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या पदाधिकाऱ्यांनी मा. प्रादेशिक उपायुक्त डॉ. दिपक खरात तसेच उपायुक्त संगीता मकरंद यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सकारात्मक चर्चा केली. यावेळी विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळवताना येणाऱ्या अडचणी, कथित आर्थिक मागणी, प्रलंबित संचिका आणि कार्यालयीन कामकाजातील अनियमिततेबाबत सविस्तर चर्चा करून निवेदन सादर करण्यात आले. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी पदाधिकाऱ्यांनी केली. संघटनेने दिलेल्या निवेदनानुसार, जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना त्रुटीपूर्ती, सुनावणी आणि इतर प्रशासकीय कारणांमुळे वारंवार अडवले जात असल्याचा आरोप आहे. काही संचिका प्रलंबित ठेवून त्या निकाली काढण्यासाठी आर्थिक मागणी केली जात असल्याचे विविध विद्यार्थी, पालक आणि नोकरदारांकडून समजल्याचे संघटनेने नमूद केले आहे. या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. जात वैधता प्रमाणपत्र हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवेशासाठी तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी महत्त्वाचे दस्तऐवज आहे. अशा प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्यांना वारंवार कार्यालयीन फेऱ्या माराव्या लागत असतील आणि आर्थिक मागणीच्या आरोपांना सामोरे जावे लागत असेल, तर हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी संबंधित गंभीर प्रश्न असल्याचे सम्यक विद्यार्थी आंदोलनाने म्हटले आहे. वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, प्रलंबित संचिका नियमानुसार निकाली काढाव्यात आणि संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता राखावी, अशी मागणीही करण्यात आली. समितीच्या नियमित सुनावण्या होत नसल्याचा, अधिकारी अभ्यागतांसाठी उपलब्ध राहत नसल्याचा आणि संचिका प्रलंबित ठेवल्या जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. तसेच, समिती अध्यक्षांकडून विद्यार्थी, अभ्यागत आणि महिला कर्मचाऱ्यांशी अर्वाच्च भाषेत बोलले जात असल्याचे संघटनेने म्हटले आहे. या सर्व बाबींची वरिष्ठ स्तरावर चौकशी करून कार्यालयीन कामकाज सुरळीत करावे, अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी केली. कंत्राटी कर्मचारी सोमनाथ चव्हाण यांच्याविरोधात यापूर्वी तत्कालीन निबंधक विशाल लोंढे आणि बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांच्याकडे निवेदनासह पैशांची मागणी झाल्याचा आरोप असलेले ऑडिओ कॉल रेकॉर्डिंग सादर केल्याचा दावाही संघटनेने केला आहे. त्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याच्या बदलीचा आदेश काढण्यात आल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. मात्र, संबंधित कर्मचारी अद्यापही कार्यालयात कार्यरत असल्याचा आरोप करत, यापूर्वीच्या तक्रारी, कथित ऑडिओ रेकॉर्डिंग आणि बदली आदेशाची पडताळणी करून नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात पुढील दोन दिवसांत अपेक्षित कार्यवाही न झाल्यास सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी सामाजिक न्याय भवन, छत्रपती संभाजीनगर येथे लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सम्यक विद्यार्थी आंदोलनाने दिला आहे. या निवेदनाच्या प्रतिलिपी सामाजिक न्याय मंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय सिरसाट, वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर आणि समाजकल्याण आयुक्त, आयुक्त कार्यालय, पुणे यांना पाठविण्यात आल्या आहेत. या निवेदनावर सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अक्रम खान, युवा नेते अमोल घुगे, प्रा. अविनाश सावंत आणि भागवत चोपडे यांची नावे असून, संशोधक विद्यार्थी अमरदिप हिवराळे, राहुल वाहूळ यांच्यासह संघटनेचे इतर पदाधिकारीही यावेळी उपस्थित होते.

## हिंगोली जिल्ह्यात पदवीधर मतदारांची संख्या ६ हजाराने घटली

**हिंगोली :** हिंगोली जिल्ह्यात पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत मागीलवेळच्या तुलनेत यावेळी मतदारांची संख्या 6 हजाराने घटली असून यावर्षी 10 हजार मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदार नोंदणीसाठी प्रचार प्रसारामध्ये निवडणुक प्रशासन अपयशी ठरल्याचे बोलले जात आहे. त्यामुळेच मतदार नोंदणीची संख्या घटल्याची चर्चा सुरु झाली आहे. छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर मतदार संघाची निवडणुक प्रक्रिया सुरु आहे. या निवडणुकीत मागील वर्षी हिंगोली जिल्हयातून 16 हजार पदवीधर मतदारांनी नोंदणी केली होती. त्यानंतर यावर्षी मतदारांची संख्या वाढणे अपेक्षीत होते. मात्र यावर्षी निर्धारीत कालावधीत ता. 6 ऑक्टोबरपर्यंत केवळ 10 हजार 315 मतदारांनीच नोंदणी केली आहे. मागील वेळच्या तुलनेत यावेळी मतदारांची संख्या तब्बल 6 हजाराने घटली आहे. पदवीधर मतदार संघाची निवडणुक जाहिर झाल्यानंतर मतदारांच्या नोंदणीसाठी जिल्हा प्रशासनाकडून म्हणावी तशी प्रचार प्रसिध्दी झालीच नाही. या शिवाय राजकिय पक्षांच्या कार्यरत्यांकडूनही पदवीधरांना नोंदणीसाठी साद घालण्यात आलीच नसल्याचे चित्र आहे. त्यामुळेच वेळी मतदारांची संख्या घटल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, यावेळी होणाऱ्या या निवडणुकीत हिंगोली जिल्हयात 36 मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान शांततेच पार पडावे यासाठी 230 कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या असून शुक्रवारी ता. 23 रोजी सकाळी आठ ते दुपारी चार यावेळेत या मतदान केंद्रावर मतदान होईल. जिल्ह्यात एकूण 10 हजार 315 मतदारांची नोंदणी झाली असून त्यामध्ये 8 हजार 337 पुरुष आणि 1 हजार 978 महिला मतदारांचा समावेश आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हास्तरावर नोडल अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली विविध पथकांची स्थापना करण्यात आली आहे. मतदान केंद्रांच्या 100 मीटर परिसरातील बंदोबस्तासाठी 36 पोलीस अंमलदार आणि एक गस्त वाहन नियुक्त करण्यात आले आहे. **मतदान केंद्रांवर आरोग्य पथकांची व्यवस्था** मतदानाच्या दिवशी मतदार तसेच निवडणूक प्रक्रियेत सहभागी अधिकारी-कर्मचाऱ्यांना आवश्यकतेनुसार तातडीची वैद्यकीय मदत उपलब्ध व्हावी, यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक, हिंगोली यांच्या माध्यमातून मतदान केंद्रनिहाय आरोग्य पथके स्थापन करण्यात आली आहेत.

## पोल्ट्रीला फटका; ब्रॉयलरला शेडमध्ये १३६ तर दुकानात २८० रुपयांचा दर

**अकोला :** विदर्भातील प्रमुख शेतीपूरक व्यवसाय म्हणून ओळखला जाणारा पोल्ट्री (कुक्कुटपालन) व्यवसाय सध्या तीव्र दुष्काळ, पाण्याचे दुर्भिक्ष, खाद्याचे वाढलेले दर व बाजारपेठेतील मंदीमुळे अस्तित्वाच्या लढाईत सापडला आहे. पावसाअभावी सोयाबीन-कापूस पिकांचे नुकसान झाल्याने ग्रामीण भागातील पैशांचे रोटेशन थांबले आहे. खरेदी क्षमता घटल्याने चिकनची विक्री 50 ते 60 टक्क्यांपर्यंत खाली आली आहे. अकोला येथील 'इंडिया पोल्ट्री ट्रेड'च्या व्यापाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, यंदा पावसाअभावी शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. ग्रामीण भागात मजुरांना काम नसल्याने बाजारातील आर्थिक उलाढाल ठप्प झाली आहे. गणेशोत्सवानंतर लिलावाचे दर 136 रुपये प्रति किलोवर गेले आहेत. आगामी नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मागणीत पुन्हा मोठी घट होण्याची शक्यता आहे. बाजारपेठेत सध्या शेतकऱ्यांच्या शेडमधून पक्षी उचलण्याचा लिलाव दर प्रति किलो 136 रुपये आहे. किरकोळ चिकन विक्रेते ग्राहकांना 280 रुपये प्रति किलोने विक्री करत आहेत. सर्व प्रकारची हवामानविषयक जोखीम आणि मृत्यूची जोखीम शेतकरी व कंत्राटी कंपन्या उचलत आहेत. कोणताही मोठा धोका न पत्करता मध्यस्थ व किरकोळ व्यापारी निश्चित नफा कमावत आहेत. हे वास्तव कुक्कुटपालन करणाऱ्या शेतकऱ्यांसोबतच्या चर्चेतून समोर आले आहे. ^ पोल्ट्री उद्योगात बहुतांश काम हे मोठ्या कंपन्यांच्या कंत्राटी (कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग) पद्धतीवर चालते. कंपन्यांना पक्षांचा उत्पादन खर्च प्रति किलो सुमारे 105 रुपये येत असताना, गेल्या दोन महिन्यांत बाजारात 65 ते 70 रुपये दराने पक्षी विकावे लागले. यामुळे कंपन्यांना प्रति किलो 30 ते 35 रुपयांचा थेट तोटा सहन करावा लागला. या प्रचंड नुकसानीमुळे कंपन्यांनी दोन ते अडीच महिने शेतकऱ्यांच्या शेडमध्ये नवीन पक्षी टाकणेच बंद (बॅच हॉलिडे) ठेवले, असे मूर्तिजापूर तालुक्यातील पोल्ट्री व्यावसायिक विकी राऊत यांनी सांगितले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १० ऑक्टोबर २०२६


## लोकसेवेचा सुगंध दरवळवणाऱ्या 'नाम'चे प्रेरणास्थान नाना पाटेकर यांना विनम्र अभिवादन!

आपल्याकडे माणसांना ती मेल्यानंतर जास्त भेटण्याची, त्यांच्यावर जीव ओतण्याची, त्यांच्यावर खूप काही लिहिण्या बोलण्याची एक स्पर्धाच लागते...मी सुद्धा याच निर्ल्लज मानसिकतेचा एक घटकच...सिंधुताई गेल्यावर जास्त कळायला लागल्या, बाबा आमटे गेल्यावर जास्त आनंदवन कळायला लागलं,बाबा आढाव गेल्यावर जास्त पाणवठ्याची ओढ लागलीअसे असंख्य उदाहरणं आहेत कि, ही काळाच्या भाळी नाव कोरणारी कवी, लेखक, विचारवंत, कलावन्त, गायक मंडळी आपल्यातून निघून गेली कि, आपण त्यांच्यावर जास्त प्रेम करतो...नानांच्या बाबतीत बहुतांश सर्वांचंच प्रेम आज जास्त उफाळून आलं...आज दिवसभर देशाच्या राष्ट्रपतीपासून ते गल्लीतल्या दादा भैय्या पर्यंत फक्त आणि फक्त नानाच नाना प्रकारे नाना लोकांनी चर्चीला...मी सुद्धा दिवसभर नानामयच झालो...नाना, एक अभिनेता, एक समाजमनाचा नेता, असंख्य कलावंताचा प्रनेता, शब्दप्रभू, शब्दांचा आणि संवादाचा बादशहा अशा असंख्य उपमांनी नानामय चर्चा संपूर्ण देशभरात झाली...यातली एक सकारात्मक बाब अशी कि, किमान नानाच्या संपूर्ण जीवनपटातून आपण एक टक्का तरी आदर्श घेऊन काम कराव ही एक उर्मी अनेकांच्या मनात आली असणारच...कारण लोकांच्या दु:खाचं बोट धरून सुखाकडे हळूहळू चालत नेणाऱ्या नानांचं काम पाहिल्यावर खरंच अश्रूंनी दाटून यायला वेळ लागत नाही...कोण बनेगा करोडपती या सेटवर नाना आणि मकरंद अनासपुरे हे आलेले आहेत. तो एपिसोड मी पाहिला आणि खरंच माझ्यासारख्या एका अत्यन्त भावनिक माणसाला रडायला येणं याचं नवल वाटायल नको...स्वत:साठी आलिशान कार खरेदी करण्यासाठी एक दोन नव्हे दहा वीस नव्हे तर तब्बल दीड कोटी रुपये जमा करून ठेवले होते...आणि एक दिवस सहज टीव्ही वर बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाची मुलाखत नानांनी बघितली... नाना भावनाविवश झाले अश्रू काठ सोडत नाहीत तोवर मकरंद अनासपुरे यांना फोन केला आणि सांगितले कि, मकरंद माझ्याकडील दीड कोटी रुपये घेऊन जा आणि प्रत्येकी पंधरा हजार रुपये द्या...मकरंद म्हणाले नाना तुम्ही स्वत: येऊन दिले तर अधिक उत्तम राहिल. नाना म्हणाले मला ते योग्य वाटणार नाही..मी स्वत: त्यांना पैसे देतो आहे हे स्वामीत्व मला प्रदर्शित करायचं नाही...आणि चक्क स्वत:च्या कष्टाचे पैसे स्वत: प्रदान करण्यासाठी न जाता नानांनी ती जबाबदारी मकरंद अनासपुरे आणि त्यांच्या सहकार्यांनावर सोपवली...मित्रहो, बंद पाकीट मध्ये शंभर रुपये दिले तर त्यावर सोनेरी पेनाने मोठ्या अक्षरात नाव लिहिणारी जमात या देशात आहे.सार्वजनिक ठिकाणी एखादी खुर्ची दिली तर त्या खुर्चीवर नाव लिहिणारी जमात या देशात आहे. इतकंच काय तर स्मशानातील बाकांवर सुद्धा सौजन्य लिहून त्या खाली मोठ्या अक्षरात नाव लिहिणारीही जमात या देशात आहे...नाना मात्र या फाजील प्रसिद्धीच्या रेषेपासून खूप अलिप्त आणि दूरच राहिले...त्यानंतर नाम फाउंडेशन ची स्थापना झाली आणि दोन महिन्यात तब्बल साठ कोटी रुपये लोकसहभागातून जमा झाले...अगदी रानात खुरपणाऱ्या, चेहऱ्यावर दुष्काळाच्या सुरकुत्या असणाऱ्या आणि पदरात घामाचा पैसा असणाऱ्या माऊलींनेही नानांना पैसे दिले...मित्रहो, घेणारा स्वच्छ आणि शुद्ध असला कि, नीतिमत्ता जागी होतं असते आणि असंख्य देणारे हात हे आपोआप पुढे येतं असतात...नाम फाउंडेशन हे त्यातलंच एक अतिशय मूर्तिमंत असं उदाहरण होय...गेल्या पाच दशके मराठी हिंदी नाट्य आणि चित्रपट सृष्टीत आढळ स्थान निर्माण करणाऱ्या नानांचं आयुष्य, त्यातला साधेपणा, निरागसता आणि अतिशय निर्मोही भाव बघितल्यावर कळतं कि, उंच असतानाही, उत्तुंग असतानाही जमिनीवर, मातीवर स्थिर थांबता येतं...अभिनय, सामाजिक कार्य, वाचन, विवेचन, पुरस्कार, लौकिक, लोकप्रियता हे सगळं काही अमर्याद असतानाही नाना इतके साधे राहिले याचं एकमेव कारण म्हणजे अंतिम श्वासापर्यंत ' प्रज्ञा ' जागृत होती. जिथं प्रज्ञा जागृत असते तिथं स्थिरता आणि संयम असतो आणि जिथं स्थिरता आणि संयम असतो तिथंच निर्मिती ही पुन्हा पुन्हा जन्म घेत असते...एक गाणं लोकप्रिय झालं कि महागायक समजणाऱ्या डिजिटल छत्र्या आपल्याकडे आहेत, एक भाषण जमलं कि, स्वत:ला महावक्ता मिरविणाऱ्या पोपटांचीही आपल्याकडे कमी नाही.. आणि एक कविता लिहिली कि, स्वत:ला कविवर्य समजणाऱ्या पांचट कविंचीही वाणवा आपल्याकडे नाही...या अशा संभ्रम निर्माण करणाऱ्या काळात, या लाईक कमेंट्स फॉलो फॉलोअर्स घंटीचं बटन यात अडकलेल्या डिजिटल भिकाऱ्यांच्या युगात नानासारखा एक अभिनयाचा प्रनेता स्थितप्रज्ञ राहतो ही या देशातील सर्व कलाकारांनी आचारसंहिता मानावी अशी बाब आहे...काळाच्या या वाटेत असंख्य कलाकार येतील जातील, लोकप्रिय होतील, फ्लॉप होतील पण नाना नावाचं हे वादळ काळाच्या भाळी कायम कोरलेलं असेल हे मात्र निश्चित...नाना पाटेकर नावाच्या नट, नाट्य आणि चित्रपटातील या सम्राटाला भावपुर्ण श्रद्धांजली.


**प्रा. शिंदे पंकज भास्करराव**
**औरंगाबाद 9529277229**


# केजी ते पीजी पर्यंत मराठा समाजाला ओबीसी सारख्या सवलतीसाठी  जी आर मध्ये दुरुस्ती करा

**प्रतिनिधी (मुंबई)** : मराठा समाजाला केजी ते पीजी आरक्षण ओबीसी समाजाला असलेल्या सवलती प्रमाणेच मिळव्यात ही मूळ मागणी मराठा आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी लाऊन धरली होती. त्या पैकी मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यां प्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती व सोयी सुविधांचा लाभ शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून अनुज्ञेय करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. अधिनस्त सर्व महाविद्यालये यांना संदर्भिय शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे बाबत आपल्या स्तरा वरुन कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा असा आदेश शासनाने काढला आहे. " मराठ्यांना ओबीसी सारखी सवलत जी आर मंजूरी म्हणजे जेष्ठअभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या अन्नत्याग उपोषण आंदोलना चे फलित असुन या व्यापकता आणण्यासाठी केजी ते पीजी पर्यंत मराठा समाजाला ओबीसी सारख्या सवलती देणे साठी या जी आर मध्ये दुरुस्ती करा अशी मागणी सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील मराठा समाजाच्या वतीने असलेले मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ता जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या १६ दिवसाच्या अन्न त्याग उपोषण आंदोलना निमित्त पुढे आली आहे. मराठा क्रांतीमोर्चा टीम मुंबई रामचंद्र शेडगे,अनिल सुर्वे,बाळासाहेब इंगळे, राजन घाग,रुपेश मांजरेकर, सदाशिव बानुगडे,संतोष शेजवळ, मारुती देसाई, राकेश वासुदेव,पांडुरंग रोडे,सुभाष देसाई,दिनेश पवार,शैलेश शिंदे,सुशील निकम,विवेक शिंदे, सूर्याजी सोनूवले,सुभाष पाटील, अंतोष कांबळे,रवींद्र शिंदे आदींनी सातत्याने मुख्यमंत्र्या सोबत पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन सादरीकरण व्हावे आणि जी आर मध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या होण्यासाठी बैठक होण्या साठी मराठा क्रांती मोर्चा टीम मुंबई पाठपुरावा करीत आली आहे. या बाबत सविस्तर वृत्तांत असा की,मराठा समाजा साठी विविध मागण्या बाबत छत्रपती संभाजीनगर येथे ९ ऑगस्ट ते २४ ऑगस्ट २०२६ दरम्यान जोरदार अन्न त्याग आंदोलन उपोषण त्यांनी केले होते या अन्न त्याग उपोषण आंदोलनाचेच हे यश आहे.या बाबत मुख्यमंत्री यांचे सोबत बैठक व्हावी म्हणुन मंत्री गिरीश महाजन मंत्री चंद्रशेखर बावनकुळे मंत्री भारतशेठ गोगावले मंत्री अतुल सावे मंत्री संजय सिरसाट आदिनी मध्यस्थी केल्याने उपोषण स्थगित करण्यात आले होते. या बाबत मराठा क्रांती मोर्चा व समस्त मराठा समन्वयक व समाज बांधवांचा पाठिंबा होता.अन्नत्याग आंदोलन उपोषण कर्ते जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी उपोषण दरम्यान महत्वपुर्ण मागणी केली होती की, मराठा समाजाला ओबीसी सारख्या सर्व सवलती के.जी. ते पी.जी. लेव्हल पर्यंत देतांना तांत्रिक,अतांत्रिक, वैद्यकीय शिक्षण,नोकरीतील नियुक्त्या, बढती आदी सर्व सवलती लागु करून खाजगी विद्यापीठ,डिम्ड युनिवार्सिटी मध्ये सुद्धा ओ बी सी सारख्या सवलती द्याव्यात या मध्ये वयाची अट शिथिलता तर द्यावीच परंतु ओबीसी आणि मराठा समाजा तील निर्माण झालेली स्थिती कायम स्वरूपी मिटवण्यासाठी " अराजकीय आरक्षण " हा शब्द आणि वरील प्रमाणे दुरुस्ती करणारा सुधारीत शासनादेश तात्काळनिर्गमित करावे ही सुद्धा अंत्यन्त महत्वाची त्यांची गेली एक दशका पासूनची मागणी होती. जुन्या आयोगाच्या शिफारशी आणि न्याय प्रविष्ठ बाबी मागण्याच्या संदर्भात चर्चेसाठी मुख्यमंत्र्या कडून मीटिंग निश्चित होण्या साठी सुद्धा प्रयत्न होत आहे. तत्कालीन न्यायमूर्ती गायकवाड आयोगाने एस ई बी सी मध्ये मराठा आरक्षण शिफारस केलेली असुन त्याच प्रमाणे तत्कालीन न्यायमूर्ती सुक्रे आयोगाने एस ई बी सी मध्ये मराठा आरक्षण शिफारस केलेली आहे. हे प्रकरण न्याय प्रविष्ट असल्या मुळे तूर्तास ओबीसी प्रमाणे सर्व सवलत लागु करावी ही मागणी जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनीच लाऊन धरलेली आहे हे विशेष होय.मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमाचा क्रम पाहता योग्य ती वेळ घेऊन लवकरात लवकर मराठा आरक्षण आणि इतर मागण्यांच्या बाबत आणि कायदेशीर व घटनात्मक संकलन असलेले जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी परिश्रम पुर्वक तयार केलेले अभ्यासु पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन लीगल टीम व मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री द्वय आणि सर्व संबंधीता समक्ष सादरीकरण करण्या साठी दखल घेण्यात आलेली असुन त्याअनुषंगिक पत्र देखील मुख्यमंत्रीकार्यालयास देण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले असुन उपोषणातील मागण्या संदर्भात लवकरात लवकर वेळ आम्ही घेऊन मराठा समाजाचे प्रश्न मार्गी लावण्यात शासन पुढाकार घेईल असे सांगण्यात आले आहे.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १० ऑक्टोबर २०२६

# मन जपले तरच जीवन समृद्ध होईल - डॉ. राजेंद्र बगाटे

मानवी जीवनात शरीराचे आरोग्य जितके महत्त्वाचे आहे, तितकेच नव्हे तर अनेकदा त्याहून अधिक महत्त्व मनाच्या आरोग्याला आहे. शरीराला त्रास झाला की आपण तातडीने डॉक्टरांचा सल्ला घेतो, तपासण्या करून घेतो आणि उपचार सुरू करतो; मात्र मनावर ताण आला, चिंता वाढली, सतत उदासीनता जाणवू लागली किंवा भावनिक अस्वस्थता निर्माण झाली, तर त्याकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती अजूनही समाजात मोठ्या प्रमाणावर दिसून येते. मानसिक त्रास व्यक्त करणे म्हणजे कमजोरी, अपयश किंवा व्यक्तिमत्त्वातील दोष आहे, असा गैरसमज अनेकांच्या मनात आहे. त्यामुळे अनेक व्यक्ती आपले दुःख मनातच दडवून ठेवतात. या परिस्थितीत मानसिक आरोग्याविषयी संवेदनशीलता निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. दरवर्षी १० ऑक्टोबर रोजी साजरा होणारा जागतिक मानसिक आरोग्य दिन ही केवळ जनजागृतीची संधी नसून व्यक्ती, कुटुंब आणि समाजाने मानसिक आरोग्याकडे नव्या दृष्टीने पाहण्याचा दिवस आहे.मानसिक आरोग्य म्हणजे केवळ मानसिक आजार नसणे एवढाच त्याचा अर्थ नाही. व्यक्तीला आपल्या भावना ओळखता येणे, परिस्थितीनुसार त्यांचे व्यवस्थापन करता येणे, दैनंदिन ताणतणावांना सामोरे जाता येणे, इतरांशी अर्थपूर्ण संबंध प्रस्थापित करता येणे आणि आपल्या क्षमतांचा सकारात्मक वापर करता येणे, हेही मानसिक आरोग्याचे महत्त्वाचे पैलू आहेत. जीवनात दुःख, भीती, राग, चिंता, निराशा किंवा अपयश येणे स्वाभाविक आहे. प्रत्येक नकारात्मक भावना ही मानसिक आजाराची खूण नसते. मात्र अशा भावना दीर्घकाळ टिकून राहिल्या, दैनंदिन जीवनातील कामकाजावर परिणाम करू लागल्या किंवा व्यक्तीला सामाजिक आणि कौटुंबिक संबंधांपासून दूर नेऊ लागल्या, तर त्याकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक असते. मानसिक आरोग्य समजून घेताना व्यक्तीला दोष देण्याऐवजी तिच्या परिस्थितीचा, अनुभवांचा आणि सामाजिक वातावरणाचा विचार करणे गरजेचे आहे.आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक जीवनशैलीत मानसिक आरोग्यापुढील आव्हाने अधिक गुंतागुंतीची झाली आहेत. शिक्षणातील वाढती स्पर्धा, रोजगारातील अनिश्चितता, आर्थिक अडचणी, कौटुंबिक मतभेद, सामाजिक अपेक्षा, बदलती जीवनशैली आणि सतत वाढणारा कामाचा ताण यांचा व्यक्तीच्या मनावर परिणाम होतो. पूर्वी व्यक्तीला स्वतःसाठी आणि कुटुंबासाठी वेळ मिळत असे; आज मात्र काम आणि वैयक्तिक जीवन यांच्यातील सीमारेषा अनेकदा अस्पष्ट झाली आहे. मोबाईल, संगणक आणि सामाजिक माध्यमांमुळे संवादाची साधने वाढली असली तरी प्रत्यक्ष मानवी संवाद आणि भावनिक जवळीक कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इतरांच्या यशाचे, सुखाचे आणि आकर्षक जीवनाचे सतत दर्शन झाल्यामुळे स्वतःच्या आयुष्याची तुलना करण्याची प्रवृत्ती वाढते. या तुलनेतून असमाधान, न्यूनगंड आणि तणाव निर्माण होऊ शकतो.विद्यार्थी आणि तरुणांचे मानसिक आरोग्य हा विशेष चिंतेचा विषय आहे. परीक्षेतील गुण, प्रवेशासाठीची स्पर्धा, करिअरची चिंता, पालकांच्या अपेक्षा, मित्रांमधील तुलना आणि भविष्याविषयीची अनिश्चितता यामुळे तरुणांवर मानसिक दबाव निर्माण होतो. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता, आवड आणि शिकण्याची गती वेगळी असते. त्यामुळे प्रत्येकाने एकाच मापदंडाने यशस्वी झाले पाहिजे, ही अपेक्षा त्याच्यासाठी मानसिक ओझे ठरू शकते. शिक्षणव्यवस्थेने केवळ गुण, परीक्षा आणि निकाल यांना महत्त्व न देता विद्यार्थ्यांच्या भावनिक आणि सामाजिक विकासालाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये प्रशिक्षित समुपदेशकांची उपलब्धता, विश्वासाचे वातावरण आणि मानसिक आरोग्याविषयी मोकळा संवाद निर्माण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याने मदत मागितली तर त्याला कमकुवत समजण्याऐवजी त्याच्या धैर्याचे कौतुक झाले पाहिजे.मानसिक आरोग्याचा प्रश्न केवळ तरुणांपुरता मर्यादित नाही. वृद्ध व्यक्तींच्या मानसिक आरोग्याकडेही तितक्याच गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. निवृत्तीनंतरची बदललेली भूमिका, उत्पन्नातील घट, जोडीदाराचा मृत्यू, मुलांचे स्थलांतर, सामाजिक संपर्क कमी होणे, शारीरिक मर्यादा आणि एकटेपणा यामुळे वृद्ध व्यक्तींमध्ये असुरक्षितता आणि भावनिक ताण निर्माण होऊ शकतो. वृद्धत्व म्हणजे निष्क्रियता नव्हे. वृद्ध व्यक्तींकडे जीवनाचा प्रदीर्घ अनुभव आणि सामाजिक ज्ञान असते. त्यांना कुटुंबाच्या निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणे, त्यांच्या अनुभवांचा आदर करणे आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याच्या संधी देणे आवश्यक आहे. कुटुंबातील संवाद आणि सामाजिक सहभाग हे वृद्धांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी महत्त्वाचे आधार ठरू शकतात.महिलांच्या मानसिक आरोग्याकडे पाहतानाही त्यांच्या सामाजिक परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे. घराची जबाबदारी, मुलांचे संगोपन, वृद्धांची काळजी, रोजगार, आर्थिक जबाबदारी आणि समाजाच्या विविध अपेक्षा यांचा अनेक महिलांवर एकाच वेळी परिणाम होतो. दुसरीकडे पुरुषांनी भावना व्यक्त करू नयेत, त्यांनी नेहमी मजबूत राहावे आणि अडचणी स्वतःच सोडवाव्यात, अशी सामाजिक धारणा त्यांच्या मानसिक आरोग्यासाठीही अडथळा ठरू शकते. दुःख व्यक्त करणे, रडणे, भीती सांगणे किंवा मदत मागणे ही कमजोरी नसून मानवी भावविश्वाची नैसर्गिक अभिव्यक्ती आहे. स्त्री आणि पुरुष दोघांनाही आपल्या भावना मोकळेपणाने व्यक्त करण्यासाठी सुरक्षित सामाजिक वातावरण मिळणे आवश्यक आहे.कुटुंब ही मानसिक आरोग्याची पहिली सामाजिक आधारव्यवस्था आहे. घरातील संवाद, परस्पर आदर, विश्वास आणि भावनिक सुरक्षितता व्यक्तीला संकटांशी सामना करण्याचे बळ देतात. त्याउलट सततची तुलना, अवास्तव अपेक्षा, अपमान, हिंसा, दुर्लक्ष आणि संवादाचा अभाव यामुळे मानसिक ताण वाढू शकतो. त्यामुळे कुटुंबातील सदस्यांनी एकमेकांचे म्हणणे ऐकून घेणे ही साधी वाटणारी गोष्टही अत्यंत महत्त्वाची आहे. एखादी व्यक्ती पूर्वीपेक्षा अधिक शांत झाली असेल, सतत एकटी राहू लागली असेल, आवडत्या गोष्टींमध्ये रस कमी झाला असेल किंवा तिच्या वर्तनात लक्षणीय बदल जाणवत असेल, तर तिची टिंगल किंवा टीका करण्याऐवजी प्रेमाने संवाद साधला पाहिजे. कधी कधी उपाय सांगण्यापेक्षा एखाद्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे अधिक प्रभावी ठरते.मानसिक आरोग्याच्या क्षेत्रातील सर्वांत मोठ्या अडथळ्यांपैकी एक म्हणजे सामाजिक कलंक. मानसिक आजार असलेल्या व्यक्तीकडे समाज वेगळ्या नजरेने पाहील, अशी भीती अनेकांना उपचार घेण्यापासून दूर ठेवते. ‘वेडा’, ‘कमजोर’ किंवा ‘असामान्य’ अशा शब्दांचा वापर व्यक्तीच्या आत्मसन्मानाला धक्का देतो. मानसिक आरोग्याशी संबंधित समस्या इतर शारीरिक आजारांप्रमाणेच समजून घेण्याची गरज आहे. मानसिक त्रास असणे म्हणजे व्यक्तीची ओळखच त्या आजाराने निश्चित होणे नव्हे. योग्य वेळी समुपदेशन, आवश्यक ते वैद्यकीय उपचार, औषधोपचार आणि कुटुंबाचा आधार मिळाल्यास अनेक व्यक्ती मानसिक अडचणींवर मात करून अर्थपूर्ण जीवन जगू शकतात. त्यामुळे मदत घेणे ही लाजेची नव्हे तर जबाबदारीची बाब मानली पाहिजे.मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी व्यक्तीच्या दैनंदिन जीवनशैलीचाही विचार आवश्यक आहे. पुरेशी आणि नियमित झोप, संतुलित आहार, नियमित शारीरिक हालचाल, छंदांसाठी वेळ, निसर्गाच्या सान्निध्यात राहणे, मित्र-परिवाराशी संवाद आणि सामाजिक सहभाग यांचा मनाच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो. सतत मोबाईल किंवा सामाजिक माध्यमांमध्ये गुंतून राहण्याऐवजी प्रत्यक्ष संवादाला वेळ देणे आवश्यक आहे. मात्र मानसिक त्रास गंभीर स्वरूपाचा असेल किंवा दीर्घकाळ टिकत असेल, तर केवळ जीवनशैलीतील बदलांवर अवलंबून राहणे योग्य नाही. मानसोपचारतज्ज्ञ, मनोविकारतज्ज्ञ किंवा प्रशिक्षित समुपदेशकांची मदत घेणे आवश्यक ठरू शकते. व्यावसायिक मदत घेण्याबाबतची भीती आणि संकोच दूर करणे ही मानसिक आरोग्यविषयक जनजागृतीची महत्त्वाची पायरी आहे.समाजशास्त्रीय दृष्टीने मानसिक आरोग्य हा केवळ व्यक्तीच्या मनाचा प्रश्न नाही. गरिबी, बेरोजगारी, सामाजिक विषमता, भेदभाव, हिंसा, असुरक्षित कामाचे वातावरण, कौटुंबिक संघर्ष आणि सामाजिक एकाकीपणा या परिस्थितींचाही मानसिक स्वास्थ्यावर परिणाम होतो. म्हणून ‘ताण घेऊ नका’ असा सल्ला देणे पुरेसे नाही; ताण निर्माण करणाऱ्या सामाजिक परिस्थितींचाही विचार करावा लागतो. ग्रामीण भागातील मानसिक आरोग्यसेवा, कामगारांचे मानसिक स्वास्थ्य, विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन, महिलांसाठी सुरक्षित वातावरण, वृद्धांसाठी सामाजिक आधार आणि वंचित समूहांसाठी सुलभ आरोग्यसेवा यांना सार्वजनिक आरोग्यव्यवस्थेत योग्य स्थान मिळाले पाहिजे. मानसिक आरोग्याची सेवा प्रत्येक व्यक्तीपर्यंत, विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.मानसिक आरोग्यविषयक जागरूकता ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित राहू नये. घरापासून शाळेपर्यंत, महाविद्यालयापासून कार्यस्थळापर्यंत आणि कुटुंबापासून समाजापर्यंत मानसिक आरोग्याविषयी मोकळेपणाने चर्चा होणे गरजेचे आहे. एखाद्याच्या मानसिक त्रासाची थट्टा न करणे, त्याला दोष न देणे, त्याचे म्हणणे संयमाने ऐकणे आणि गरज पडल्यास योग्य मदतीपर्यंत पोहोचवणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे. मानसिक आरोग्याला वैयक्तिक कमतरता न मानता मानवी आरोग्याचा अविभाज्य भाग मानले, तर मानसिक आरोग्याबाबतचा सामाजिक कलंक कमी होऊ शकतो.जागतिक मानसिक आरोग्य दिन आपल्याला एक साधा पण अत्यंत महत्त्वाचा संदेश देतो की मनाची काळजी घेणे ही चैनीची गोष्ट नसून जीवनाची गरज आहे. निरोगी शरीरासोबत निरोगी मन असेल तरच व्यक्ती आपल्या जीवनातील आव्हानांना समर्थपणे सामोरी जाऊ शकते आणि कुटुंब, समाज व राष्ट्राच्या विकासात अर्थपूर्ण योगदान देऊ शकते. म्हणून स्वतःच्या मनातील बदलांकडे लक्ष देणे, जवळच्या व्यक्तीच्या भावनिक अवस्थेची दखल घेणे आणि गरज भासल्यास मदत घेणे याला आपण सामान्य जीवनाचा भाग बनवले पाहिजे. संवेदनशील समाज तोच, जो केवळ आजारी शरीराची काळजी घेत नाही तर अस्वस्थ मनालाही आधार देतो. मन जपले तर व्यक्ती जपली जाते आणि व्यक्ती जपली तरच कुटुंब, समाज आणि अखेर संपूर्ण मानवता अधिक निरोगी, संवेदनशील आणि समृद्ध होऊ शकते.



**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**bagate.rajendra5@gmail.com**